राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय, पुणे - १
डॉ. अशोक मो. मेहता
एम.बी.बी.एस.डी.पी.एच.
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य
दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५५५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
इ-मेल : sbhivs@pn3.vsnl.net.in
crs_d83@yahoo.com
डॉ.नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे-१

जा.क्र. आमाजीआ/कक्ष-८३/जमृनों-अनुपप्र/२४९७-५७२/०७, दिनांक:- २१ फेब्रुवारी, २००७

**परिपत्रक**

प्रति,
जिल्हा आरोग्य अधिकारी तथा
जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यु
जिल्हा परिषद ......................(सर्व)

कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा
निबंधक, जन्म व मृत्यु, परळ,बृहन्मुंबई महानगरपालिका,

आरोग्य अधिकारी तथा निबंधक, जन्म व मृत्यु
महानगरपालिका,....................(सर्व)

कार्यकारी अधिकारी, कॅन्टोन्मेंट बोर्ड तथा
निबंधक, जन्म व मृत्यु,...........(सर्व)

प्रशासक ॲम्युनिशन फॅक्टरी तथा
निबंधक, जन्म व मृत्यु,...........(सर्व)

विषय :- **जन्म मृत्यु नोंदणी**
**अनुपलब्धता प्रमाणपत्र देणेबाबत.** (Non Availability Certificate)

संदर्भ :- १) मा. अतिरिक्त सचिव तथा महानिबंधक, जन्म व मृत्यु, भारत सरकार, गृह मंत्रालय, नवी दिल्लीकडील इंग्रजी पत्र No.1/10/2004-VS(CRS), दि. ३१ जानेवारी, २००७
२) मा. संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक, जन्म व मृत्यु, महाराष्ट्र राज्य,मुंबईकडील इंग्रजी पत्र No. DHS/B&D/ Non availability certi/D-18/07, दि. ९ फेब्रुवारी २००७

मा. महानिबंधक, जन्म व मृत्यु, भारत सरकार, गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांनी जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम ३(३) च्या अधिनतेने, जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म आणि मृत्यु नोंदणी नियम

२००० मधील नियम १३(३) नुसार, जन्म व मृत्यु घटना नोंदणी संदर्भातील निबंधक, जन्म व मृत्यु यांनी द्यावयाच्या अनुपलब्धता प्रमाणपत्रा संबंधीच्या मार्गदर्शनपर सूचना (इंग्रजीत) प्राप्त झालेल्या आहेत.

सदरहू मार्गदर्शनाची, इंग्रजी परिपत्रकाची प्रत माहितीस्तव व त्यातील सूचनेनुसार, निबंधक, जन्म व मृत्यु यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील जन्म व मृत्यु घटनेच्या नोंदीची कार्यवाही करणेस्तव सोबत जोडलेले आहे.

कृपया सदर परिपत्रकातील, जन्म व मृत्यु नोंदणी अनुपलब्धता प्रमाणपत्र देणे बाबत मार्गदर्शक सूचनेचा काटेकोरेपणे अवलंब करणेस्तव सर्व निबंधकांना सूचना द्याव्यात.

जन्म व मृत्यु घटनेच्या नोंदणीसंबंधी अर्जदारांना जो अनुपलब्धता प्रमाणपत्र निबंधक, जन्म व मृत्यु यांच्याकडून दिला जातो, त्यावेळी निबंधकांनी खाली नमूद बाबी संबंधी माहिती घ्यावी/तपासणी करण्यात यावी.

१) अर्जदार जेव्हा अनुपलब्धता प्रमाणपत्राची मागणी निबंधक, जन्म व मृत्यु यांच्याकडे करतील त्यावेळी त्यांचे राहण्याच्या ठिकाणासंबंधी, जन्मठिकाणा संबंधी कागदपत्र, पुरावा म्हणून प्राप्त करावा.

२) पुरावा म्हणून रेशनकार्ड, शाळा प्रवेशनोंदी, माध्यमिक/उच्चमाध्यमिक प्रमाणपत्र (मार्कशिट) इ. पैकी कोणतीही प्रत.

३) निबंधक, जन्म व मृत्यु यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यापूर्वी अर्जदारांनी मागणी केलेल्या अनुपलब्धता प्रमाणपत्राच्या संदर्भातील, कारणाच्या सत्यतेसंबंधी चौकशी/खात्री करावी.

४) अर्जदार यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्राची मागणी निबंधक, जन्म व मृत्यु यांच्याकडे करतेवेळी जर का वर नमूद बाबीपैकी, पुरावाखातर काहीच सादर केले नाही/असमर्थता दाखविली तर, पोलिस चौकशी/पोलिसामार्फत तपासणी झाल्यानंतरच प्रमाणपत्र देण्यात यावे.

वरील मार्गदर्शक सूचना आपल्या जिल्हयातील सर्व निबंधक, जन्म व मृत्यु (पंचायत समितीचे गटविकास अधिकारी/मुख्याधिकारी नगरपालिका) यांना, व तसेच सर्व तहसिलदार यांना कळविण्यात यावे. व केलेल्या कार्यवाही संबंधी कृपया या कार्यालयास अवगत करावे.

सहपत्र - मा. महानिबंधक, जन्म व मृत्यु, नवी दिल्ली
यांचे दि. ३१ जानेवारी २००७ चे परिपत्रक.

(स्वाक्षरी)
उपसंचालक आरोग्य सेवा तथा
उपमुख्य निबंधक, जन्म व मृत्यु,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१) मा.अतिरिक्त सचिव, तथा महानिबंधक, जन्म व मृत्यु, भारत सरकार,गृहमंत्रालय, व्ही.एस.डिव्हीजन, पश्चिम विभाग-१, आर. के. पूरम, नवी दिल्ली -११००६६

२) मा. संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक, जन्म व मृत्यु महाराष्ट्र राज्य,मुंबई - ३२

प्रत सस्नेह अग्रेषित :- उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ, कार्यालय,...............(सर्व)